ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
July – December 2021- Vol. 10 No. 2

# गांधीवादी विकास प्रतिमानः एक विश्लेषणात्मक अध्ययन

**डॉ. डी. डी. भोसले**
*पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग*
*यशवंत महाविद्यालय,नांदेड*

संपुर्ण जगभरातील लोक ज्या काही मोजक्या विचारवंताना ओळखतात आणि त्यांच्या विचारांचा, तत्वांचा अंगिकार करतात त्यापैकी एक महान तत्वज्ञ, विचारवंत म्हणजे भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी होत. व्यक्ती, समाज आणि अर्थव्यवस्थेसमोर निर्माण झालेल्या सामाजिक, आर्थिक, राजकिय, कायदेविषयक समस्या सोडविण्यासाठी त्यांनी संपूर्ण मानव जातीला अंहिसा आणि सत्यांच्या मार्गावर आधारित 'असहकार' आणि सत्याग्रह ही दोन प्रभावीशस्त्रे दिली या शास्त्रांनी संपूर्ण जगामध्ये क्रांती केली व करत आहेत त्यांनी मांडलेल्या विचारांना तत्वांना गांधीवाद असे म्हटले जाते हा 'गांधीवाद' केवळ एक विचार नाही तर ती एक जीवन प्रणाली आहे.[1] महात्मा गांधीनी मांडलेल्या अर्थशास्त्रीय विचारांचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, महात्मा गांधीनी अर्थशास्त्राला नैतिकतेची जोड दिली त्यांच्या मते अर्थशास्त्राला नैतिकमुल्यांची जोड दिल्याशिवाय व्यक्ती आणि राष्ट्राचे कल्याण होऊ शकत नाही. त्यांच्या विचारांचा प्रभाव स्वतंत्र्य पूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारतीय आर्थिक प्रणालीवर झाल्याचे दिसून येते म्हणून गांधीवादी आर्थिक विकासाचे प्रतिमान नेमके काय होते हे माहित करून घेण्यासाठी प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी करण्यात येत आहे.

**शोध निबंधाची उदिष्टे :–**

1) गांधीवादी विकास प्रतिमानाची संकल्पना स्पष्ट करणे.
2) गांधीवादी विकास प्रतिमानाची समर्पकता तपासून तिचे विश्लेषण करणे.

**संशोधन पध्दती :–**

प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी करण्यासाठी द्वितीय तथ्य संकलन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. यासाठी प्रस्तुत विषयासी संबंधित संदर्भ ग्रंथ आणि संकेत स्थळाचा उपयोग करण्यात आला आहे.

**संशोधन समस्येचे विश्लेषण :–**

प्रस्तुत संशोधन समस्येचे विश्लेषण गांधीवादी विकास प्रतिमानाची संकल्पना आणि गांधीवादी विकास प्रतिमानाची समर्पकता अशा दोन मुदयाच्या अनुशंगाने केले आहे.

**गांधीवादी विकास प्रतिमान :–**

महात्मा गांधीनी स्वतःचे असे स्वतंत्र आर्थिक विचार मांडले नाहीत पण त्यांनी वेळोवेळी केलेली भाषणे व लिहिलेले लेख यांच्या आधारे गांधी विचारांच्या अभ्यासकांनी गांधीवादी आर्थिक विचार ग्रंथ रुपाने मांडले आहेत. उदाः

1. श्रीमान नारायण अग्रवालः Gandhan Plan
2. जे.सी.कुमारप्पा : Gandhian Economy and other Essays
3. एम.एल.दांतवाला :Gandhism Revisited(1944)
4- जे.जे.अंजरिया : An Essay on Gandhi an Economics (1944)
5. अमृतानंद दासः Reintroduction to Gandhian Economic Thinking
6. श्री भावतोब दत्तः Condustim of Gandhism Economics Thought
7. श्री जयप्रकाश नारायण : सर्वोदय योजना (1960)

इत्यादी थोडक्यात भारताने स्वतःचा आर्थिक विकास कसा करावा याविषयी मांडलेल्या विचारांना गांधीवादी विकास प्रतिमान असे म्हणतात.

**गांधीवादी विकास प्रतिमानाच्या मुख्यबाबी :–**

गांधीवादी विकास प्रतिमानात प्रामुख्याने श्रमप्रधान उत्पादन तंत्र,स्वावलंबन, ग्रामस्वराज्य, कुटीर व ग्रामीण उदयोगांना प्राधान्य, सत्ता व संपत्तीचे विक्रेंद्रीकरण विश्वस्त, स्वदेशीचा पुरस्कार, जीवन उपयोगी शिक्षण प्रणाली आणि कृती आराखडा इत्यादी बाबीचा समावेश होतो.
बाबीचा समावेश होतो.

**गांधीवादी विकास प्रतिमानाची समर्पकता :–**

**1) श्रम–प्रधान उत्पादन तंत्रः**

गांधीजींचा यंत्राचा सरसकट विरोध नव्हता त्यांच्या मते यंत्रामूळे जर फक्त काही लोकांच्या वेळेत आणि श्रमात बचत होत असेल पण लाखो लोकांना बेकार होऊन उपासमारीची वेळ येत असेल तर अशा यांत्रिकीकरणास माझा विरोध आहे. भारतामध्ये मुबलक मनु" यबळ आहे म्हणून या मनुष्यबळाला रोजगार देण्यासाठी श्रमप्रतिष्ठेवर आधारित श्रम–प्रधान उत्पादन पध्दतीचा आपण अंगिकार करावा त्यांचा हा दृष्टीकोन आज देखील उपयुक्त वाटतो.


**2) आर्थिक स्वावलंबन :–**

गांधीजीच्या मते देश मुलभूत आवश्यक गरजांच्या बाबतीत स्वयंपूर्ण असावा. देश जर स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विदेशी वस्तुवर अवलंबून असेल तर देशाचे आर्थिक, सांस्कृतिक नैतिक शोषण होईल म्हणून त्यांनी स्ववलंबनाच्या तत्वाचा पुरस्कार केला व स्वदेशीचे तत्व सांगितले त्याचा हा दृष्टीकोन आज देखील संयुक्तिक आहे.

**3) ग्राम स्वराज्य :–**

गांधीजींच्या मते भारताचे खरे चित्र मुठभर शहरांमध्ये नव्हे तर त्याच्या सात लाख खेडयामध्ये घडते म्हणून त्यांनी आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू खेडयाला मानले व ग्राम स्वराज्याची संकल्पना मांडली आजच्या स्थितीला भारतामध्ये वाढते शहरीकरण आणि त्यामुळे शहरी भागात वाढणारा लोकसंख्येचा ताण ही प्रमुख समस्या आहे. एका रिपोर्टनुसार भारतात दरवर्षी एक कोटी वीस लाख लोक ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतरण करत आहेत. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या रिपोर्टनुसार जगातील सर्वात जास्त 15 प्रदुषित शहरांपैकी 14 शहरे ही भारतातील

आहेत. यावर उपाय करावयाचा असेल तर गांधीजीची ग्रामस्वराज्याची संकल्पना आत्मसात करणे समर्पक ठरते.




**4) कुटीर व ग्रामीण उदयोग** :–

2011 च्या जनगणनेनुसार शहरी भागात 1.3 कोटी लोक झोपडपट्टीत तर 93 लाख लोक स्लम एरियामध्ये राहत आहेत. भारताच्या लोकसंख्येची घनता दर चौरस कि.मी. ला 382 व्यक्ती इतकी आहे तर मेट्रोसिटीमध्ये ती 12000 व्यक्ती इतकी जास्त आहे. यासर्व लोकांची सुप्त इच्छा ग्रामीण भागात वापस जाण्याची आहे. पण तिथे कोणतेच आर्थिक आकर्षण दिसत नाही म्हणुन ते मजबुरीने शहरात राहत आहेत. आज जर आपण गांधीच्या विचाराप्रमाणे ग्रामीण भागात कुटीर व ग्रामीण उदयोगाचा विकास केला तर वाढत्या शहरीकरणाला नक्की पायबंद बसेल.

**5) सत्ता व संपत्तीचे विकेंद्रीकरण** :–

गांधीजीच्या मते सामाजिक, व्ययक्तीक संपत्ती, सत्ता, तसेच उत्पादन प्रक्रियेचा एक अविभाज्य भाग म्हणजे विकेंद्रीकरण होय. सत्ता आणि संपत्तीचे केंद्रीकरण झाले तर त्यामुळे गुलामगिरी आणि आर्थिक शोषणाला सुरुवात होते. यातून अर्थव्यवस्थेपूढे विविध संकटांची एक शृंखलाच तयार होते त्याचा हा विचार आजच्या स्थितीत देखील समर्पक वाटतो.

**6) विश्वस्त** :–

गांधीजींना वर्ग संघर्ष मान्य नव्हता तो उद्‌भवू नये म्हणून त्यांनी विश्वस्ताची संकल्पना मांडली त्यांच्या मते सर्व मालमत्ता खऱ्या अर्थाने समाजाचीच असते म्हणून भांडवलदार वर्गाने स्वतःला मालक न समजता या मालमत्तेची जोपासना व देखरेख करणारा विश्वस्त समजावे यामुळे दोन वर्गात संघर्ष देखील होणार नाही आणि कामगारांचे शोषण देखील होणार नाही.

**7) स्वदेशीची पुरस्कार** :–

गांधीजीच्या मते भारताचा आर्थिक विकास केवळ ग्रामीण लघु–कुटीर उदयोगांची स्थापना केल्याने होणार नाही तर भारतीय लोकांनी विदेशी वस्तुंच्या ऐवजी स्वदेशी वस्तुचा पुरस्कार करणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. आज भारत महासत्ता होण्याचे स्वप्न बघत आहे. त्यासाठी मेकइन इंडिया सारख्या अभिनव संकल्पना देखील राबविल्या जात आहेत. या सर्व योजना यशस्वी करण्यासाठी गांधीजींनी सांगितलेले तत्त्व अर्थात स्वदेशीचा पुरस्कार चा अंगीकार करणे आवश्यक वाटते.

**8) जीवन उपयोगी शिक्षण प्रणाली** :–

महात्मा गांधीच्या मते शिक्षणाचा उद्‌देश केवळ नौकरदार वर्ग तयार करणे हा नसुन खरा माणुस बनविणे हा आहे म्हणुन भारताने स्वतःच्या अर्थव्यवस्थेला अनुरुप 'मुल उदयोगी शिक्षण प्रणालीचा' स्वीकार करावा ज्यामुळे माणसाच्या मनाचा मेंदुचा आणि हाताचा अर्थात कौशल्याचा विकास होईल. यामुळे बेकारीचा प्रश्नच निर्माण होणार नाही पण जर आपण ब्रिटीश शिक्षण प्रणालीचा स्वीकार केला तर शिक्षणाचा उद्‌देश फक्त नौकरी मिळविणे हा राहील आणि जर सर्वांना नौकरीचा संधी नाही मिळाल्या तर बेकारांची फौज तयार होईल म्हणुन आजच्या स्थितीतील बेकारी व आत्महत्येची समस्या यावर कायम स्वरुपी उपाय करावयाचा असेल तर गांधीजीची जीवन उपयोगी शिक्षण प्रणाली स्विकारणे आवश्यक आहे.

**9) कृती आराखडा :–**

महात्मा गांधीजींच्या अगोदर दादाभाई नौरोजी, रानडे, गोपाळकृभण गोखले इत्यादी मान्यवरांनी आपले आर्थिक विचार मांडले होते व त्याच्या मते परिस्थितीत बदल करण्यासाठी शासनाने काहीतरी करावे असे त्यांना वाटत होते पण महात्मा गांधीजीने स्वतःचा कृती आराखडा (Action plan) देखील तयार केला स्वतःच्या विचारांच्या अंमलबजावणीसाठी त्यांनी वेगवेगळया संस्था निर्माण केल्या उदाः सेवाग्राम, स्वदेशी शाळा, आदी वस्त्रांचा वापर व चरखा, स्वदेशी बॅका, विश्वस्त, ग्राम स्वराज्याचा आराखडा इत्यादी याचबरोबर स्वतःच्या विचारांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ते सर्व बदल स्वतःमध्ये आणि स्वतःच्या अनुयायांमध्ये करत असत. त्याचा हा कृती आराखडा आज देखील उपयुक्त व समर्पक ठरत आहे.

**सारांश :–**

उपरोक्त विवेचनावरुन आपणास गांधीवादी विकास प्रतिमानाची संकल्पना लक्षात येते. श्रमप्रधान उत्पादन पध्दती, संपत्तीचे विकेंद्रीकरण, आर्थिक स्वावलंबन, कुटीर व ग्रामीण उदयोगांचा विकास, कौशल्यावर आधारीत शिक्षण प्रणाली आणि स्वतःच्या संकल्पना वास्तविक जीवनात सत्य ठरविण्यासाठी केलेला कृती आराखडा या सर्व बाबी आजच्या स्थितीला देखील निश्चितपणे समर्पक ठरतात असे म्हणावे लागेल.

**संदर्भ :–**

1. *भालेराव निर्मल (2004), आर्थिक विचारांचा इतिहास, निराली प्रकाशन.*
2. *गांधी मो. क. (2012), सत्याचे प्रयोग वा आत्मकथा, नवजीवन ट्रस्ट*
3. *Jhingan M.L.; History of Economic Thought,Vrinda Publications (P) Ltd.*
4. *खादेवाले बी.. वी. आणि नेरुरकर अमरजा, (1984); अर्थशास्त्रीय मतप्रणालीचा इतिहास, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळाखाली विद्या बुक्स औरंगाबाद.*
5. *कविमंडन विजय (2009); आर्थिक विचारांचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.*
6. *Mahajan M; Economic Thought of Mahatma Gandhi, Discovery Publishing.*
7. *Pathak Swanand (2015); Gandhian Thought, CBC Publishers & distribution Pvt.Ltd.*